गुणवत्ता सुधारणेतून मुल्यवर्धन

Ingrid Fromm

कोल्ली हिल्स च्या विशिष्ठ पर्यावरणीय परिस्थितीचा तेथे पिकणाऱ्या कॉफीच्या सुगंधावर व गुणवत्तेवर प्रभाव पडतो. येथील सेंद्रिय शेती करणाऱ्या लहान शेतकऱ्याच्या बाबतीत हे पुन्हा सिद्ध झाले आहे कि विवधतापुर्ण कृषि पर्यावर्णीय शेती पद्धतीचा दृष्टीकोन हा उत्पादनाच्या गणुवत्तेत निश्चितच भर टाकतो. त्या मुळे हि शेती पध्दती नुसतीच परवडणारी नव्हे तर आर्थिक दृष्ट्या सुधा फायदेशीर आहे.



कोल्ली हिल्स येथील सुगंध आणि गुणवतेसाठी प्रसिद्ध असलेल्या कॉफीच्या बिया.

मोटर सायकल, कार्स, ट्रक्स, बसेस अशा वाहनांनी सतत भरलेला अरूंद रस्ता, त्यात भर म्हणून ७० धोकादायक वळणे अशा अवस्थेत तामिळ नाडूतील नम्मक्कल जिल्ह्यातील कोल्ली हिल्स या लहान शहरात पोहोचणे खूप त्रासदायक आहे. एकदा का हा रस्ता सपंला कि सदुंर हिरवे गार जंगल जणू प्रवाशांची वाटच पाहत बसलेय असे वाटते. कॉफी उत्पादनासाठी खर तर हे ठिकाण उपयक्त नाही,परंतु पूर्ण जगभरात कॉफीचे जे उत्पादन होते ते अशाच प्रकारच्या दूरवर, पोहचण्यास कठीण असलेल्या भागात होते. अर्थात एका विशिष्ट प्रकारच्या कृषि पर्यावरणीय झोन मुळे येथील कॉफीला खास असा सुगंध व गुणवत्ता आहे यात वादच नाही. भारतातील अशा विभागातून कॉफी उत्पादन घेणे यातून हे सिद्ध होते कि कृषि पर्यावरणीय झोन च्या तत्वानुसार कॉफीचे पिक घेणे शक्य आहे. तसेच किफायतशीर सुद्धा आहे.

कोल्ली हिल्स च्या जंगली भागात, तुरळक भाताची खाचरे असलेल्या ठिकाणी श्रीम.जयम सुलावनथीपत्ती ह्या गेल्या २० वर्षापासून कॉफीचे उत्पादन घेत आहेत. आपल्या पती बरोबर २.५ हेक्टर जमिनीपैकी १ हेक्टर वर त्यांनी अरेबिक कॉफी ची लागवड केली आहे. त्यासोबतच मिरी, केळी, साबू कंद, विलायची, लिंबू, फणसं व डाळीम्बी ई. पिके सुद्धा सेंद्रिय पद्धतीने घेतली जात आहेत. कॉफी लागवड हा त्यांचा कौटुंबिक व्यवसाय आहे. पतीच्या सहाय्याने हि शेती त्या करतात. त्यांची तीन मुले नम्माक्कल येथे तांत्रिक शिक्षण घेत आहेत. कधी तरी त्यांची सुद्धा त्यानां मदत होते. दर वर्षी सुमारे २०० किलो कॉफी च्या सुक्या बिया चे उत्पादन त्या करतात. बियाचा गर काढण्याचे काम शेजारच्या शेतात करतात व बिया परत आणून घराच्या छतावर सुकवल्या जातात. चार वर्षा पूर्वी नवीन झाडांची लागवड केल्याने उत्पादनात बऱ्यापैकी वाढ झाली. नवीन लागवडीसाठी व बिया सकुवाण्याचा ओटा बनवण्यासाठी जयम ला कॉफी बोर्डाकडून कर्ज घ्यावे लागले. खरेदीदार थेट शेतावर येतात व किम्मत ठरवितात. याच्या मागचे कारण असे कि जयम च्या कुटंबाला तयार कॉफी बाजारापर्यंत घेऊन जाने खूप कठीण आहे. या परिस्थतीत जयम ला खरेदीदार यांच्याशी जास्त भाव मिळावा म्हणून वाटाघाटी करण्यास वाव नाही हे खरे असले तरी जयम ला कॉफी लागवडीतुन बऱ्यापैकी उत्पन्न मिळत आहे. अर्थात वाढीव उत्पन्न वाढीव उत्पादनामुळे मिळते आहे. हे येथे महत्वाचे. या वाढीव उत्पन्नामुळे एखाद्या मजुराचा पगार तिला आता भागवता येतो. अर्थात जयम चा पती देखील कधी कधी दुसऱ्याच्या शेतावर मजूरीचे काम करतो व कुटूंबाला हातभार लावतो. एका बाजूला सपुंर्ण देशभरात अगदी निकराचे प्रयत्न करून शेती केली जात आहे. त्याच वेळी कोल्ली हिल्स सारख्या ठिकाणी सुरु असलेली कृषी – पर्यावरणीय हे सिद्ध करते कि भारतात शाश्वत शेती शक्य व परवडण्यासारखी आहे. अशी बरीच शेतकरी कुटंबे जयम च्या कुटुंबा प्रमाणे वेगवेगळी पिके घेऊन आपले गुजराण करत आहेत. 'विविधता' हे त्याच्यातले महत्वाचे तत्व आहे. कॉफी, मिरी, विलायची, फणस, डाळीम्बी, लिंबू, ई. पिकातुंन देखील कमाई केली जाते. साबुदाण्याचा कंद घरी खाण्यासाठी जसा वापरला जातो तसाच त्याच्यावर प्रक्रिया करून स्थानिक बाजारात देखील विकला जातो. या लोकांच्या आहारात इत्तर शेतकऱ्यायांनी पिकवलेली भरड धान्येदेखील येतात.

कृषि उत्पादनाचे मूल्यवर्धन

कोल्ली हिल्स मधील सुमारे १५०० शेतकऱ्यांचे ''कोल्ली हिल्स कृषि – जैवविविधता संवर्धन संघ'' नावाचे संघटन आहे. जयम देखील या संघाची सदस्य आहे. हा संघ म्हणजे एक प्रकारचा बचत गट च आहे. आपल्या संघातील सदस्यांना कॉफी, साबुदाणा व भरड धान्ये अशा पिकांचे मूल्यवर्धन करण्याचे प्रशिक्षण या संघातर्फे दिले जाते. हा संघ प्रामुख्याने जैवविविधता जतन करणे व सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणेचे काम करतो. प्रशिक्षणाचा भर देखील सेंद्रिय शेतीवरच जास्त असतो. काही शेतामध्ये जमिनीत लागत देण्यासाठी VAM (Vesicular-arviscular mycorrhiza) बसवण्यात आले आहेत. जैविक खते व इत्तर जैविक लागतीला संघा मार्फत प्रोत्साहन दिले जाते. एम एस स्वामिनाथन रिसर्च फौंडेशन च्या मदतीने बचत गट निर्माण व मुल्यसंवर्धनाच्या संधी शोधणे सोपे झाले.

बाजारपेठ विस्तार

कोल्ली हिल्स मध्ये पिकवलेली कॉफी बहूतेक स्थानिक बाजारातच खपते हे विशेष. तामिळनाडू आणि विशेषत: दक्षिण भारत हा भाग कॉफी सस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. चेन्नई, बंगलोर अशा मोठ्या शहरात अगदी रस्त्यावरच्या ठेलेवाल्यापसून ते मोठ मोठ्या दुकानातुन व हॉटेल्समधून कॉफी विकली जाते.

कोल्ली हिल्स पररसरातील शतकऱ्यांनी प्रक्रिया केलेली कॉफी तिच्या मुळ सुगंध व गुंणवत्तेसह कोल्ली हिल्स शहरात एकत्र केली जाते. तिथून ती कॉफी नम्मक्कल, सालेम, चेन्नई व बंगलोर ला रवाना होते. कॉफी भाजणाऱ्या मोठ्या कंपन्या हि कॉफी विकत घेतात व भाजून विकतात. कोल्ली हिल्स मध्ये पिकणारी सर्व कॉफी भारतातच खपते. पण कोल्ली हिल्स मध्ये कॉफी पिकण्याची क्षमता अजूनही खूप आहे. पण तेवढी उपयोगात आणली गेली नाही. वास्तविक कोल्ली हिल्स मध्ये पिकवलेली कॉफी हि इत्तर अन्नधान्यासोबत पुर्णपणे सेंद्रीय पद्धतीने पिकवली जाते आणि हा ग्राहकासाठी आकर्षणाचा मुद्दा आहे. बंगलोर सारख्या शहरात ग्राहकांमध्ये आपल्या आहराबाबत जाणीव निर्माण झाली आहे. विषमुक्त,भेसळ व्यतिरिक्त अन्नधान्ये व पदार्थाच्या संबधित प्रचंड संशय निर्माण झालेला आहे. अशा वेळी कोल्ली हिल्स मध्ये संपूर्ण सेंद्रिय पद्धतीने पिकणारी कॉफी व इत्तर पिके सुद्धा प्रमाणीकरण केल्यास वाढीव दराने खपतील व ग्राहकांना देखील खात्रीचे पदार्थ मिळतील. केवळ कॉफीच जरी प्रमाणीकरण करून व लेबल लाऊन विकली तरी बऱ्यापैकी वाढीव दर मिळू शकतो. कोल्ली हिल्स मधील छोट्या शेतकऱ्यांचा कॉफी निर्मिती हा फायदेशीर उद्योग आहे. जयम च्या म्हणण्यानुसार येथील शेतकरी कुटुंबांना वातावरण बदलाचा किंवा अन्न धान्याच्या किंमती वाढण्याचा किवा धान्यामध्ये भेसळ, रसायने असण्याचा कोणताच धोका नाही, कारण येथे सर्व पिकामध्ये विविधता आहे. या विविधते मध्ये कॉफी सारखे पिक चांगले दर देते. ज्यामुळे कुटूंबाचे उत्पन्न वाढते. धान्ये, भाजीपाला, फळे असे उत्पादन घरच्या सकस आहारात येतात शिवाय कौटुंबिक गरज भागुन राहिलेले उत्पादन स्थानिक बाजारात विकून त्याचे ही पैसे येतात. जयम मानते कि जैवविवधता व कृषी पर्यावरणीय पद्धतीने शेती केल्यामुळे केवळ २.५ एकर शेतीमध्ये तीन मुलांच्या शिक्षणासाठी पैसा मिळवू शकली. हे तिच्यासाठी एक मोठे यश आहे असे तिला वाटते. या कोल्ली हिल्स मधील लहान शेतकऱ्यांच्या उदाहरणावरून हे सिद्ध होते की जैविववधता पूर्वक व कृषि पर्यावरणीय पद्धतीने केलेली शेती केवळ परवडणारी नव्हे तर फायद्याचीच आहे. जमिनीची धूप होणे, सुपीकता कमी होणे, पिका खालील जमिनीचे प्रमाण गतीने कमी होणे, वातावरण बदलाचे चटके बसणे, या सर्वामुळे ग्रामीण लोकांच्या मनामध्ये निराशा उत्पन्न होणे, त्यातुन तरूणानी रोजगारासाठी शहराकडे धाव घेणे ई. सर्व प्रश्नावर एकमेव उपाय म्हणजे पर्यावरणीय शेती पद्धती असेच वाटते. पर्यावरणीय आणि आर्थिक अशा दोन्ही बाजूनी पहिले तर सध्या जागतीक पातळीवर ज्या संकटाना सामोरे जावे लागत आहे. त्यावर पर्यावरणीय शेती हाच एक योग्य पर्याय आहे.



सिल्वर ओक झाडे, केली व मिरी या पिकासोबत कोल्ली हिल्स मध्ये घेतली जाणारी कॉफी

सेंद्रिय पद्धतीने पिकवलेली ओरिजिनल कोल्ली हिल्स कॉफी बऱ्यापैकी वाढीव दर देते याची खात्री आहे. कारण तशी तिची ख्याती निर्माण झाली आहे.

Ingrid Fromm
Bern University of Applied Sciences,
School of Agricultural, Forest and Food Sciences,
Laenggasse 85
3052 Zollikofen, Switzerland
Email : ingrid.fromm@bfh.ch

मराठी अनुवाद - श्री. लक्ष्मीकांत पडोळे, निम फाऊंडेशन

Source : *Enhancing Value by improving Quality, LEISA India, March 2018*